Centre for Distance And Online Education
Kolhapur.
Shivaji University



Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
### दि. ०५.०७.२०२४ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरु असून मे. टीम लिझ, मुंबई यांच्या LMS प्रणालीतून पुढील अनुषंगिक आवश्यक कार्यवाही सुरु आहे. यासाठी त्यांचेबरोबर वार्षिक दरकरार झालेला आहे. फेब्रुवारी २०२४ मधील प्रवेश अनुषंगिक कार्यवाही दि. ३१/०३/२०२४ पर्यंत पूर्ण झाली असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची कार्यवाही जुलै २०२४ पासून सुरु करावयाची आहे. यासंदर्भात वार्षिक करारामधील क्र. ४ मधील मुद्यानुसार व गतबैठकीत झालेल्या चर्चेनुसार पुढील कार्यवाही संदर्भात तांत्रिक समितीची एकत्रित बैठक दि.०५.०७.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता या केंद्रात खोली क्रं. ३१२ येथे आयोजित करणेत आली या बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रा. (डॉ.) डी. एच. दगडे, रसायनशास्त्र अधिविभाग | : | अध्यक्ष, |
| २ | डॉ. के. एस. ओझा, संगणकशास्त्र अधिविभाग | : | आमंत्रित सदस्य |
| ३ | डॉ. के. बी. पाटील | | समन्वयक, ऑनलाईन अभ्यासक्रम |
| ४ | श्री. राहुल पुरी | : | मे. टिम लिझ, मुंबई यांचे प्रतिनिधी |
| ५ | डॉ. एस. एम. कुबल | : | उपकुलसचिव, प्रवेश व परीक्षा विभाग, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |

श्री. एन. एस. माने, उपकुलसचिव, परीक्षक नियुक्ती व श्री. ए. ए. रेडेकर, प्र. संचालक, संगणक केंद्र व डॉ. व्ही एस. खंडागळे हे इतर बैठक व्यस्तेतमुळे या बैठकीस उपस्थित राह शकले नाहीत. या बैठकीस डॉ. डी. के. मोरे, मा. संचालक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र हे रजेवर असलेमुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

सर्वप्रथम या बैठकीमध्ये डॉ. के. बी. पाटील, समन्वयक यांनी बैठकीचे प्रास्ताविक व पार्श्वभूमी विषद केली. त्यामध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरु असून मे. टीम लिझ, मुंबई यांच्या LMS प्रणालीतून पुढील अनुषंगिक आवश्यक कार्यवाही सुरु आहे. यासाठी त्यांचेबरोबर वार्षिक दरकरार झालेला आहे. फेब्रुवारी २०२४ मधील प्रवेश अनुषंगिक कार्यवाही दि.३१.०३.२०२४ पर्यंत पूर्ण झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची कार्यवाही (फेब्रुवारी २०२४) साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व तदअनुषंगिक कार्यवाही त्यांच्या सदर प्रणालीतून सुरू असून दि. १८.५.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार सर्व संबंधित घटकांची एकत्रित बैठक दि. ३१.०५.२०२४ रोजी झाली असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सर्व संबधित विभागांना कळविले असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती दिली.

त्यानंतर समितीने या केंद्रातील सर्व संबंधित घटकाशी विस्तृत चर्चा केली व त्यानंतर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.



Scanned with CamScanner

विषय क्रं. १ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे जुलै - ऑगस्ट २०२४ सेशनची प्रवेशप्रक्रिया व तदअनुषंगिक एल.एम.एस. अनुषंगिक कार्यवाही करणेबाबत.

ठराव : - १. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमासंदर्भात में. टीम लिझ, मुंबई यांच्या **LMS** प्रणालीतून कार्यवाही करताना आलेल्या अडचणीसंदर्भात सर्व संबंधित घटक (दूरशिक्षण, संगणक आय.टी., वित्त व लेखा विभाग व परीक्षा विभाग इत्यादी विभाग) यांच्या दि. ३१.०५.२०२४ रोजीच्या बैठकीनुसार आवश्यक बाबीची पूर्तता मे. टीम. लिझ यांच्याकडून करून घेण्यात यावी.

२. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे जुलै-ऑगस्ट २०२४ सेशनची प्रवेशप्रक्रिया व तदअनुषंगिक एल.एम.एस. अनुषंगिक कार्यवाही प्रवेश सुरू करणेपूर्वी त्यांच्या प्रणालीतून डेमो टेस्ट करून प्रवेश सुरू करणेस मान्यता देण्यात आली.

आयत्या वेळचे विषय

१. ऑनलाईन अभ्यासक्रमएम.बी.ए. समन्वयक व या केंद्रातील शिक्षक संवर्गासाठी में. टीम लिझ, मुंबई यांच्या **LMS** प्रणालीतून आवश्यक माहिती उपलब्ध होणेसाठी प्रशिक्षण तात्काळ आयोजित करावे.

२. ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांना **LMS** प्रणाली वापरणांसदर्भातील युझर मॅन्युअल संकेतस्थळावर उपलब्ध करावे

३. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज ऑनलाईन सादर करताना न्यायालयीन व इतर आवश्यक बाबी संदर्भात हमीपत्र घ्यावे. यासाठी मसुदा तयार करून त्याची प्रशासकीय मान्यता घ्यावी.

शेवटी डॉ. के. बी. पाटील, समन्वयक, ऑनलाईन अभ्यासक्रम यांनी ऑनलाईन अभ्यासक्रम यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहिर केले.

डॉ. के. बी. पाटील
समन्वयक,
ऑनलाईन अभ्यासक्रम

डॉ. एस. एम. कुबल
उपकुलसचिव,
प्रवेश व परीक्षा विभाग,
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Centre for Distance And Online Education
Kolhapur.
Shivaji University

प्रा. (डॉ.) डी. एच. दगडे,
रसायनशास्त्र अधिविभाग
(अध्यक्ष)



Scanned with CamScanner